## - माहितीपत्रक / जाहिरात -

# छत्रपती संभाजीनगर जिल्हा होमगार्ड विभागातील पथक कार्यालय निहाय पुरुष व महिला रिक्त असलेल्या एकूण, ४६६ पदांकरिता दिनांक १६ ऑगष्ट, २०२४ पासून होमगार्ड नोंदणी प्रक्रिया आयोजित करण्यात आलेली आहे. रिक्त पदांची पथक निहाय सविस्तर माहिती व भरती विषयक सुचना, नियम, शर्ती व अटी खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

## - होमगार्ड संघटना -

**उददेश :-** देशातील जास्तीजास्त नागरीकांना सैनिकी, तसेच आपतकालीन मदतकार्याचे, कायदा व सुव्यवस्था सुरळित राखण्याचे प्रशिक्षण देवून जबाबदार व शिस्तप्रिय नागरीक घडविणे हा होमगार्ड संघटनेचा उददेश आहे.

१. **होमगार्ड सदस्यत्व -** महाराष्ट्रातील होमगार्ड संघटना ही शासन संचलित पुर्णत: मानसेवी तत्वावर आधारीत आहे. या संघटनेचे सदस्य होणे म्हणजे कोणत्याही प्रकारची नोकरी अथवा रोजगार नाही. हे सदस्यत्व तीन वर्षांकरीता दिले जात असून आपण संघटनेसाठी दिलेल्या सेवेच्या गुणवत्तेवर पुढे ३ -३ वर्षांच्या टप्प्याने वयाच्या ५८ वर्षांपर्यंत पुन:नोंदणीकृत करता येते..

२. **होमगार्ड सदस्यांचे कर्तव्य -** होमगार्ड सदस्यांना दररोज कर्तव्य दिले जात नाही .
पोलीस दलाच्या मागणी प्रमाणे कायदा व सुव्यवस्था राखणे कामी पोलीस दलासोबत बंदोबस्त कर्तव्य,आपतकालीन परिस्थितीमध्ये अग्निशमन, विमोचन, पूरविमोचन तसेच रोगराई / महामारीकाळात, संपकाळात प्रशासनांस मदतकार्य अशी कर्तव्ये दिली जातात.

३. **होमगार्ड ना देय भत्ते :-** होमगार्ड सदस्यांना बंदोबस्त काळात प्रतिदिन रु. ५७०/- कर्तव्य भत्ता व रु. १००/- उपहारभत्ता दिला जातो. तसेच प्रशिक्षण काळात रु. ३५/- खिसाभत्ता व रु. १००/- भोजनभत्ता व साप्ताहिक कवायतीसाठी रु. ९०/- कवायत भत्ता दिला जातो.

४. **शास्ती -** होमगार्ड सदस्यांना दररोज कर्तव्य दिले जात नाही परंतू अत्यावश्यक प्रसंगी बंदोबस्त कर्तव्याकरीता विनाकारण अनुपस्थित राहणाऱ्या/ कर्तव्यामध्ये कसूर करणाऱ्या / आदेशांचे पालन न करणाऱ्या होमगार्ड सदस्यांवर मुंबई होमगार्ड अधिनियम १९४७ कलम ७(१) अन्वये बडतर्फ किंवा रु. २५०/- इतका दंड / तीन महीन्याची साधी कैद अशी शिक्षा करण्याची तरतूद आहे.

५. **होमगार्ड नोदणी -** होमगार्ड नोदणी करीता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही . सदस्यत्व मिळणेकरीता काणत्याही इतर मार्गाचा (वशिला किंवा लाच) अवलंब करु नये. याकरीता कोणीही लाच /पैशाची मागणी केल्यास पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, छत्रपती

संभाजीनगर किंवा मा. जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधिक्षक छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.

६. **होमगार्ड सदस्यत्वाचे फायदे -**

१. सैनिकी गणवेश परीधान करणेचा मान व विनाशुल्क सैनिकी प्रशिक्षण
२. ३ वर्षे सेवापुर्ण होमगार्डना राज्य पोलीस दल, वनविभाग, अग्निशमन दलामध्ये ५% आरक्षण.
३. प्रथमोपचार, अग्निशमन, विमोचन या सारख्या विषयांचे प्रशिक्षण घेण्याची संधी.
४. गौरवास्पद कामगिरी केल्यास विवीध पुरस्कार/पदके मिळविण्याची संधी.
५. स्वत:चा व्यवसाय/शेती इ. सांभाळत देशसेवा करण्याची संधी.

## होमगार्ड नोंदणी नियम व अटी

१. **होमगार्ड पात्रतेचे निकष :-**

अ) शैक्षणिक पात्रता - कमीत कमी १० वी उत्तीर्ण (SSC)

ब) शारिरीक पात्रता -

१. वय - २० वर्षे पुर्ण ते ५० वर्षांच्या आत. (दि. ३१/०७/२०२४ रोजी )
२. उंची - पुरुषांकरीता - १६२ से. मी. महिलांकरीता - १५० से. मी.
३. छाती - ( फक्त पुरुष उमेदवारांकरीता )
(न फुगविता किमान ७६ से.मी. कमीत कमी ५ सेमी फुगविणे आवश्यक )

क) आवश्यक कागदपत्र -

१. रहीवासी पुरावा - आधारकार्ड , मतदान ओळखपत्र (दोन्ही अनिवार्य)
२. शेक्षणिक अहर्ता प्रमाणपत्र
३. जन्मदिनांक पुराव्याकरीता SSC बोर्ड प्रमाणपत्र /शाळा सोडल्याचा दाखला.
४. तांत्रिक अहर्ता धारण करीता असल्यास तत्सम प्रमाणपत्र.
५. खाजगी नोकरी करीत असल्यास मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
६. ३ महीन्याचे आतील पोलीस चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र

२. **शारिरीक क्षमता चाचणी-**

*उमेदवारांना प्रत्येक शारिरिक चाचणी प्रकारात ४०% गुण मिळवून पात्र होणे आवश्यक असल्याने एका चाचणीमध्ये अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या पुढील चाचण्या घेतल्या जाणार नाहीत.

**अ) धावणे**

| **पुरुष उमेदवार** | | **महीला उमेदवार** | |
|---|---|---|---|
| **१६०० मी. धावणे** | **२० गुण** | **८०० मी. धावणे** | **२५ गुण** |
| ५मि.१०सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २० गुण | २मि.५०सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २५ गुण |
| ५मि.१० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५मि.३० सेकंदापेक्षा कमी | १८ गुण | २मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.०० सेकंदापेक्षा कमी | २२ गुण |

| | | | |
|---|---|---|---|
| ५मि.३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५मि.५० सेकंदापेक्षा कमी | १६ गुण | ३मि.०० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.१० सेकंदापेक्षा कमी | १८ गुण |
| ५मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६मि.१० सेकंदापेक्षा कमी | १४ गुण | ३मि.१० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.२० सेकंदापेक्षा कमी | १४ गुण |
| ६मि.१० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६मि.३० सेकंदापेक्षा कमी | १२ गुण | ३मि.२० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.३० सेकंदापेक्षा कमी | १० गुण |
| ६मि.३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६मि.५० सेकंदापेक्षा कमी | १० गुण | ३मि.३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.४० सेकंदापेक्षा कमी | ०६ गुण |
| ६मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७मि.१० सेकंदापेक्षा कमी | ०६ गुण | ३मि.४०सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.५० सेकंदापेक्षा कमी | ०४ गुण |
| ७मि.१० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७मि.३० सेकंदापेक्षा कमी | ०२ गुण | ३मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ४मि. पेक्षा कमी | ०२ गुण |
| ७ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त | ० गुण | ४ मि. ०० सेकंदापेक्षा जास्त | ० गुण |

**ब. गोळाफेक** - पुरुष उमेदवारांकरीता .

| **गोळाफेकीचे  अंतर मीटर मध्ये** | | |
|---|---|---|
| ८.५० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त | -- | १० गुण |
| ७.९० मीटर किंवा जास्त | ८.५० मीटरपेक्षा कमी | ०९ गुण |
| ७.३० मीटर किंवा जास्त | ७.९० मीटरपेक्षा कमी | ०८ गुण |
| ६.७० मीटर किंवा जास्त | ७.३० मीटरपेक्षा कमी | ०७ गुण |
| ६.१० मीटर किंवा जास्त | ६.७० मीटरपेक्षा कमी | ०६ गुण |
| ५.५० मीटर किंवा जास्त | ६.१० मीटरपेक्षा कमी | ०५ गुण |
| ४.९० मीटर किंवा जास्त | ५.५० मीटरपेक्षा कमी | ०४ गुण |
| ४.३० मीटर किंवा जास्त | ४.९० मीटरपेक्षा कमी | ०३ गुण |
| ३.७० मीटर किंवा जास्त | ४.३० मीटरपेक्षा कमी | ०२ गुण |
| ३.१० मीटर किंवा जास्त | ३.७० मीटरपेक्षा कमी | ०१ गुण |
| ३.१० मीटर पेक्षा कमी | - | ०० गुण |

सुचना- i) उमेदवाराला जास्तीजास्त तीन संधी दिल्या जातील व त्यातील अधित्तम अंतर ग्राहय धरले जाईल.

ii) गोळाफेकीत फेकलेला  गोळा जर सिमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारांस नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील. (उदा. जर गोळाफेकीचे अंतर ६.१० मीटर असेल तर उमेदवाराला ६ गणु देण्यात येतील)

**क. गोळाफेक** - महिला उमेदवारांकरीता .

| **गोळाफेकीचे अंतर  अंतर मीटर मध्ये** | | |
|---|---|---|
| ६.०० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त | -- | १० गुण |
| ५.५० मीटर किंवा जास्त | ६.०० मीटरपेक्षा कमी | ०८ गुण |
| ५.०० मीटर किंवा जास्त | ५.५० मीटरपेक्षा कमी | ०६ गुण |
| ४.५० मीटर किंवा जास्त | ५.०० मीटरपेक्षा कमी | ०४ गुण |
| ४.०० मीटर किंवा जास्त | ४.५० मीटरपेक्षा कमी | ०२ गुण |
| ४.०० मीटर किंवा कमी | - | ०० गुण |

सुचना- i) उमेदवाराला जास्तीजास्त तीन संधी दिल्या जातील व त्यातील अधित्तम अंतर ग्राहय धरले जाईल.

ii) गोळाफेकीत फेकलेला  गोळा जर सिमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारांस नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील. (उदा. जर गोळाफेकीचे अंतर ५ मीटर असेल तर उमेदवाराला ६ गणु देण्यात येतील)

**ड. तांत्रिक अहर्ता गुण** -

| **तांत्रिक अहर्ता एकुण गुण १०** | **अटींची पुर्तता केल्यास** | **गुण** |
|---|---|---|
| १. आय टी आय (ITI) प्रमाणपत्र धारक | यापैकी १ अट पुर्ण करीत असेल तर | २ गुण |
| २. खेळामध्ये प्रविण्य मिळविलेल्या व्यक्ती. | यापैकी २ अट पुर्ण करीत असेल तर | ३ गुण |
| (जिल्हास्तरीय क्रिडास्पर्धामध्ये प्राविण्यप्राप्त) | यापैकी ३ अट पुर्ण करीत असेल तर | ४ गुण |
| ३.माजी सैनिक (डिस्चार्ज कार्ड आवश्यक) | यापैकी ४अट पुर्ण करीत असेल तर | ५ गुण |
| ४. एन.सी.सी. बी प्रमाणपत्र | यापैकी ५ अट पुर्ण करीत असेल तर | ७ गुण |
| ५. एन.सी.सी. सी प्रमाणपत्र | यापैकी ६ अट पुर्ण करीत असेल तर | ८ गुण |
| ६. नागरी संरक्षण सेवेत परंतु स्थानिक ठिकाणी तीन प्रशिक्षण पुर्ण केलेले प्रमाध्सपत्र धारक<br>७. जड वाहनचालक परवाना धारक | **सर्व अटी पुर्ण करीत असतील तर** | **१० गुण** |

- **शारिरिक क्षमता चाचणी पात्र ठरल्यानंतरच तांत्रिक अर्हतांचे गुण विचारात घेतले जातील**

## नोंदणी अर्ज भरणे संदभातील सुचना

१. होमगार्ड नोंदणीचे अर्ज छ. संभाजीनगर जिल्हयाकरीता दि. **२७/०७/२०२४ ते १४/०८/२०२४ या कालावधीमध्ये** https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php या संकेतस्थळावर भरता येतील. अर्ज भरणेपुर्वी दिलेले माहिती पत्रक ऑनलाईन माहिती फक्त इंग्रजी या भाषेमधून भरावयाची असुन माहिती भरताना अचूक व काळजीपुर्वक भरावयाची आहे. उदा. आधारकार्ड क्रमांक, जन्मदिनांक व्यवस्थित नोंद कराव्यात. एका उमेदवाराला आधारकार्ड क्र. च्या सहाय्याने एकदाच अर्ज दाखल करता येईल.

२. ***उमेदवार ज्या भागातील रहीवासी आहे तो भाग ज्या पोलीस ठाणेच्या अंतर्गत येतो त्यांना त्याच पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस ठाणे आणि पथकामध्ये त्याच जिल्हयात अर्ज दाखल करता येईल. इतर जिल्हयातील अर्ज बाद ठरतील.***

३. अर्ज **SUBMIT** केल्यावर Print Registration Form या मेनू मध्ये जावून त्याची छायांकीत प्रत काढावयाची आहे. त्यावर उमेदवारांनी भरलेला सर्व मजकूर छापून येईल . त्यावर आपला वर्तमानातील एक फोटा चिटकवावा, मराठी मधील नाव उमेदवारानी स्वत: पेनानी लिहावयाचे आहे . इतर कोणतीही माहिती उमेदवारानी भरू नये.

४. **ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत शेवटच्या दिवशी सायं. ५ वाजेपर्यत राहील**

५. कागदपत्र पडताळणी व शारिरिक क्षमता चाचणी करीता येताना अ.क्र. १. क मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व आवश्यक कागदपत्रांच्या उमेदवारांनी स्वत: स्वाक्षरी केलेल्या छायांकित प्रति अर्जासोबत जोडाव्यात. अर्ज नोंदणीच्या दिवशी स्वत: घेवून यावे. दोन फोटो व मुळ कागदपत्र नोंदणीच्या वेळी पडताळणीकरीता बंधनकारक राहील.

६. उमेदवारांना नोंदणीकरीता स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल, नोंदणी दरम्यान किंवा प्रवासादरम्यान कोणतीही दुखापत झाल्यास त्याची सुपंर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

७. पात्र उमेदवारांची अंतिम निवड पोलीस ठाणे निहाय रिक्त असलेल्या जागांनुसार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल. समान गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवाराच्या बाबतीत वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांस प्राधान्य दिले जाईल. तसेच वय समान असेल तर शैक्षणिक अहर्ता व तांत्रिक प्रमाणपत्रांच्या आधारावर निवड निश्चित करणेत येईल. तसेच महिला उमेदवारांमधून अनुषेशांची संख्या पुर्ण न झाल्यास त्या जागी पुरुष उमेदवार घेऊन, अनुशेष पुर्ण करण्यात येईल.

८. यापुर्वी होमगार्ड संघटनेतून अकार्यक्षम/बेशिस्त ठरल्याने न्यायालयीन प्रकरणी दोषी असल्याने सेवासमाप्त केलेले होमगार्ड नोंदणीस अर्ज करणेस अपात्र ठरतील. मात्र स्वेच्छेने राजिनामा दिलेले होमगार्ड विहीत अटी पुर्ण करीत असतील तर अर्ज करणेस पात्र राहतील.

९. अंतिम निवड यांदी https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php व http://www.aurangabadruralpolice.gov.in/ ह्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. प्रतिक्षा यादी (Wating List) राहणार नाही किंवा प्रसिध्द केली जाणार नाही.

१०. पथक /पोलीस ठाणे निहाय रिक्त जागा निश्चित करण्याचे सर्व अधिकार मा. जिल्हा समादेशक होमगार्ड छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवले आहे.

११. अर्ज भरणेसंदर्भात काही अडचण असल्यास जिल्हा होमगार्ड कार्यालय छ. संभाजीनगर येथे ०२४०-२३३४६८३ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**होमगार्ड नोंदणीचे ठिकाण -- दिनांक १६ ऑगष्ट , २०२४ रोजी आवेदन अर्ज केलेल्या उमेदवारांनी आवश्यक त्या शैक्षणीक, तात्रीक, उपलब्ध करुन देण्यात नमुन्यांचे छायांकित प्रतिसह तसेच मुळ कागदत्रांसह ``पोलीस मुख्यालय, पोलीस अधिक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, टिव्ही सेंटर जवळ छत्रपती संभाजीनगर..``येथे उपस्थित रहावे.**

**ऑनलाईन अर्ज खालीलप्रमाणे भरावा**

होमगार्ड विभागाच्या https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login१.php या संकेत स्थळावर जावुन HGs ENROLLMENT या मेनू मधून ONLINE ENROLLMENT FORM हा सबमेनू निवडावा.

***१.*** सर्व प्रथम जिल्हा Select करावा . ***(ज्या जिल्हयात नोंदणी जाहीर झाली असेल तेच जिल्हे मेनू मध्ये उपलब्ध असतील.)***

२. त्यानंतर आपण ज्या पोलीस ठाणेच्या हददी मध्ये राहता त्या विभाग ज्या होमगार्ड पथकामध्ये येतो ते पथक आणि पोलीस ठाणे Select करावे. याकरीता खालील तक्ता पहावा.

| **अ.क्र.** | **होमगार्ड पथक/उपपथक** | **अनुशेष** | | | **अंतर्गत पोलीस ठाणे** |
|---|---|---|---|---|---|
| | | **पुरुष** | **महिला** | **एकूण** | |
| १. | छत्रपती संभाजीनगर | 87 | 45 | 132 | छत्रपती संभाजीनगर शहरातील पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व पोलीस स्टेशन **, चिखलठाणा, करमाड, फुलंब्री पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| २. | खुलताबाद | २६ | २१ | ४७ | खुलताबाद पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |

| अ.क्र. | होमगार्ड पथक/उपपथक | अनुशेष | | | अंतर्गत पोलीस ठाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | महिला | एकूण | |
| ३ | कन्नड | २८ | १९ | ४७ | कन्नड शहर, कन्नड ग्रामीण, पिशोर, देवगांव रंगारी पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| ४ | सिल्लोड | २६ | ०५ | ३१ | सिल्लोड शहर, सिल्लेड ग्रामीण, वडोदबाजार पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| ५ | सोयगांव | ०५ | २७ | ३२ | सोयगांव, अजिंठा, फर्दापूर पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| ६ | गंगापूर | ४९ | २३ | ७२ | गंगापूर, सिल्लेगांव पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| ७ | वैजापूर | ३९ | २५ | ६४ | वैजापूर, शिऊर, विरगांव पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| ८ | पैठण | २२ | १९ | ४१ | पैठण, एम.पैठण, पाचोड, बिडकीन पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| | **एकुण** | **२८२** | **१८४** | **४६६** | |

**(**.. मा.पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर शहर हद्दीतील पोलीस स्टेशन -- सिटी चौक, क्रांती चौक, बेगमपुरा, छावणी, दौलताबात, एम.वाळूज, वाळूज, वेदांतनगर, सातारा, उस्मानपुरा, जवाहर नगर, पुंडलीक नगर, मुकूंदवाडी, एम.सिडको, सिडको, हर्सुल, जिन्सी)**

३. आपला १२ अंकी आधार क्र. काळजीपुर्वक भरावा. चुकीचा भरल्यास अर्ज बाद ठरविला जाईल.

४. यानंतर लिंग , पुर्ण पत्ता, शिक्षण , व्यवसाय , इमेल आयडी, ही माहीती काळजीपुर्वक भरावी.

५. वरील जाहीरातीमध्ये दिल्याप्रमाणे ज्या प्रकारची तांत्रिक अर्हता आहेत त्यांची संख्या Select करावी. ***( उदा. उमेदवार जड वाहन परवानाधारक ,प्राविण्यप्राप्त खेळाडू आणि NCC B प्रमाणपत्र धारक असेल तर तांत्रिक अर्हता संख्या तीन (Three) राहील)***

६. जन्मदिनांक , उंची (से. मी. मध्ये ) काळजीपुर्वक भरावी.

७. यापुर्वी होमगार्ड सेवेत असाल तर YES असे निवडावे. असाल तर ज्या कारणास्तव कमी करणेत आले त्या आदेशाची प्रत सोबत जोडावी.

८. अर्ज SUBMIT केल्यावर आपण सरळ PRINT करण्यासाठीच्या Page वर जाल त्याठीकाणी आपला आधार क्र. आणि जन्मदिनांक भरुन आपल्या अर्जाची पहाणी करुन अर्जाची PRINT A4 पेपरवर काढावी व नोंदणी करीता येताना आवश्यक कागदपत्रांसह सादर करावी.

**९. नोंदणी करिता सोबत येतांना ऑन-लाईन आवेदन प्रिंट सह या सोबत सहपत्रीत केलेले, (१) उमेदवारांचे तांत्रीक गुण नमुना, (२) उमेदवारांचे शैक्षणीक अर्हता, रहिवासी, कागदपत्रे पडताळणी सुची, (३) निवेदन क्रमांक ०१, (०४) निवेदन क्रमांक ०२, (०५) निवेदन क्रमांक ०३ सोबत जोडावे.**

**उमेदवारांकरिता महत्वाची सुचना --**

**कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सर्वर कनेक्टीवीटी मिळत नसल्यास किंवा आवेदन अर्ज (Online Form) भरण्यास अडचणी येत असल्यास कार्यालयीन वेळ वगळून अर्ज भरणे बाबत कार्यवाही करावी.**

२३/०१/२५

**(सुनिल कृष्णा लांजेवार)**
जिल्हा समादेशक होमगार्ड
तथा अपर पोलीस अधिक्षक (ग्रामीण)
छत्रपती संभाजीनगर

# :-: उमेदवारांचे तांत्रीक गुण :-:

(१) नाव :-: ..........................................................

(२) पथक कार्यालय :-:............................... (३) पोलीस स्टेशन..........................

(४) नोंदणी क्रमांक :-: ....................................

(५) छाती (चेस्ट) क्रमांक :-:................................

| अ.क्र. | तांत्रीक अर्हता | ☑होय / ☒ नाही | गुण (फक्त कार्यालयीन उपयोगकरिता) |
|---|---|---|---|
| १) | ITI प्रमाणपत्र | | |
| २) | खेळाडु प्रमाणपत्र (जिल्हास्तरीय) | | |
| ३) | माजी सैनिक(ओळखपत्र/प्रमाणपत्र) | | |
| ४) | एन.सी.सी (बी) प्रमाणपत्र | | |
| ५) | एन.सी.सी. (सी) प्रमाणपत्र | | |
| ६) | नागरी संरक्षण सेवेत असल्यास प्रमाणपत्र | | |
| ७) | जड वाहन परवानाधरक (Transport) | | |
| | **एकुण** | | |

स्थळ --
दिनांक ........./........./..........

**उमेदवाराची स्वाक्षरी**

**कागदपत्र स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी व नाव**

# :-: उमेदवारांचे शैक्षणीक अर्हता, रहिवासी,कागदपत्र पडताळणी सूची :-:

(१) नाव :-: ............................................................

(२) पथक कार्यालय :-:............................... (३) पोलीस स्टेशन..........................

(४) नोंदणी क्रमांक :-: .....................................

(५) छाती (चेस्ट) क्रमांक :-:.................................

| अ.क्र. | शैक्षणीक अर्हता | | ☑होय / ☒ नाही |
|---|---|---|---|
| १) | शाळा सोडण्याचा दाखला (TC) | | |
| २) | १० वी पास गुण पत्रक (मार्क शिट) | | |
| ३) | १० वी पास बोर्ड प्रमाणपत्र | | |
| ४) | १२ वी पास गुण पत्रक (मार्क शिट) | | |
| ५) | १२ वी पास बोर्ड प्रमाणपत्र | | |
| ६) | वय व अधिवास प्रमाणपत्र (Age And Domicile) (चालु वैधता) | | |
| ७) | पदवीधर (BA,B.COM,B.SCI,MA,M.COM,M.SCI) | | |
| ८) | D`ed/B`ed प्रमाणपत्र | | |
| ९) | इतर शैक्षणीक कागदपत्रे | | |
| | १) | | |
| | २) | | |
| | ३) | | |
| १०) | रहिवासी दाखला (आधार कार्ड, इलेक्ट्रीक बिल, किंवा इतर) | | |
| | १) | आधार कार्ड | |
| | २) | पॅन कार्ड (Pan Card) | |
| | ३) | इलेक्ट्रीक बिल | |
| | ४) | शिधापत्रीका (Ration Card) | |
| | | | |
| | | एकुण | |

**(सुचना – अनुक्रमांकनुसार कागदपत्र जोडावे.)**

स्थळ --

दिनांक ......../......../..........

**उमेदवाराची स्वाक्षरी**

**कागदपत्र स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी व नाव**

# :-: निवेदन क्र.३ :-:

मी खालील सही करणार श्री/श्रीमती.........................................................................................

राहणार.................................................................................................... असे निवेदन करतो की, मी यवतमाळ जिल्हा होमगार्ड नोंदणी मध्ये पात्र झालो/झाले तर होमगार्ड संघटनेत माझी ३ वर्षाची सेवा पुर्ण करेल. तसेच मी तालुका पथक कार्यालय व जिल्हा कार्यालय अंतर्गत असलेल्या कोणत्याही पोलीस स्टेशनला बंदोबस्त करण्याकरिता बाधिल राहील. करिता निवदेन देत आहे

स्थळ --
दिनांक ........./........./..........

**उमेदवाराची स्वाक्षरी**

# :-: निवेदन क्र.२ :-:

मी खालील सही करणार श्री/श्रीमती.................................................................................

राहणार......................................................................................... असे निवेदन करतो की, मी बेरोजगार नसुन व्यवसाय/नौकरी करित आहे. तसेच मी कोणत्याही शैक्षणीक संस्थेत शिक्षण घेत नाही, तसेच माझ्या विरुध्द कोणत्याही पोलीस स्टेशन मध्ये कोणत्याच प्रकारचा गुन्हा दाखल नाही, किंवा न्याय प्रविष्ट नाही.

सदर माहिती खोटी आढळल्यास त्यास मी स्वत: वैयक्तीक जबाबदार राहील. व होमगार्ड सदस्य नोदणीस अपात्र राहील. व कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील. करिता सदर निवेदन लिहुन देत आहे.

स्थळ --
दिनांक ........./........./..........

**उमेदवाराची स्वाक्षरी**

# :-: निवेदन क्र. १ :-:

मी खालील सही करणार श्री/श्रीमती.......................................................................... राहणार................................................................................... असे निवेदन करतो की, मला कोणताही स्वरुपाचा गंभीर आजार नाही. तसेच सद्यस्थितीत मला कोणताही किरकोळ आजार नाही. तसेच होमगार्ड सदस्य नोंदणीमध्ये मी सहभाग घेत असुन मैदानी चाचणीमध्ये कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्यासाठी मी स्वत: वैयक्तीक जबाबदार असेन.

स्थळ --
दिनांक ........./........./..........

**उमेदवाराची स्वाक्षरी**